**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी ठाणे**
(आस्थापना शाखा)
पहिला मजला, आस्थापना शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, कोर्ट नाका, ठाणे (प) ४०० ६०१.
दुरध्वनी क्र. २५३४३६३६ (विस्तार २११) फॅक्स क्र. २५३४९२०० ईमेल – est.collectorthane@gmail.com

---

क्र.सामान्य/कक्ष-१/टे-१/आस्था/प्र.क्र.९१/२०१७ दिनांक:- ३१/१०/२०१७

विषय :- तलाठी संवर्गातून मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या तलाठी कर्मचा-यांची दिनांक ०१/०१/२०१७ ची जेष्ठता दर्शवणारी अंतिम जेष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.

**ज्ञापन** :-

ठाणे जिल्हयातील तलाठी संवर्गातून मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या तलाठी कर्मचा-यांची प्रारुप जेष्ठता या कार्यालयाचे समक्रमांकाचे ज्ञापन दिनांक १७/०७/२०१७ अन्वये प्रसिध्द करण्यात आली होती. त्यावर प्राप्त झालेल्या हरकतींवर निर्णय घेवून त्यावर घेतलेले निर्णय सोबतच्या प्रपत्र - अ मध्ये दर्शविण्यात आलेले आहेत.

सोबत तलाठी संवर्गातून मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या तलाठी कर्मचा-यांची दिनांक ०१/०१/२०१७ रोजीची जेष्ठता दर्शवणारी अंतिम जेष्ठता यादी प्रसिध्द करणेंत येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२ मधील नियम ३ (क) व ४ (१) मधील तरतूदी तसचे शासनाकडील पत्र दिनांक १८/०२/२०१२, दिनांक ०९/१०/२०१३, दिनांक ०६/१२/२०१३ व शासनाकडील परीपत्रक दिनांक ३१/०१/२०१४ व त्याच प्रमाणे महाराष्ट्र दुय्यम सेवा विभागीय परीक्षा (तलाठी संवर्गाकरीता) नियम १९९७ व तलाठी संवर्गातून मंडळ अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी महाराष्ट्र महसूल अर्हता परीक्षा नियम १९९८ विचारात घेवून महसूल अर्हता परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व सदर परीक्षा उत्तीर्ण होणेपासून सूट दिलेल्या तलाठी यांची अंतिम जेष्ठता यादी तयार करण्यात आलेली आहे. तसेच अन्य विभाग/जिल्हा/ उपविभागांतुन आलेल्या तलाठी कर्मचारी यांची सेवा जेष्ठता शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.२१०/१०/१२ दिनांक ०३.०६.२०११ मधील अट क्र. ८ मधील तरतुदीनुसार बदलीनंतर सदर पदावर रुजु झालेल्या दिनांकास निश्चित केली आहे. त्यानुसार संबंधित उपविभागीय अधिकारी यांचेकडून प्राप्त अहवाल व सुधारीत यादी विचारांत घेवून अंतिम जेष्ठता सूची तयार करण्यात आली आहे.

सर्व उपविभागीय अधिकारी / तहसिलदार / कार्यालय प्रमुख / शाखा प्रमुख यांना सूचित करण्यात येते की, सदरची जेष्ठता यादीच्या प्रती संबंधित तलाठी कर्मचा-यांना वितरीत करुन संबंधितांची त्यावर दिनांकासह पोहोच घेण्यात यावी. तसेच सदरची जेष्ठता यादी कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येवून, त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदरची यादी कार्यालयाच्या www.thane.nic.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्वाक्षरी/-
( डॉ.महेंद्र कल्याणकर)
जिल्हाधिकारी ठाणे

प्रत :-

१) मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे माहितीस्तव सादर.
२) उपविभागीय अधिकारी ठाणे/कल्याण/भिवंडी/उल्हासनगर
३) तहसिलदार ठाणे/कल्याण/भिवंडी/उल्हासनगर/मुरबाड/अंबरनाथ/शहापूर
४) शाखा प्रमुख सर्व ............जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
५) शाखा प्रमुख, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (NIC), जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
   २/- सदरची जेष्ठता यादी या कार्यालयाच्या www.thane.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी. सदरची जेष्ठता सूची ३० दिवस संकेतस्थळावर ठेवण्यात यावी.
६) आस्थापना आदेश संचिका.

जिल्हाधिकारी ठाणे करिता